# किरकोळ दिवाणी अपील क्र. २/२०२६ मधील निशाणी १६ खालील आदेश
## (शिवाजी राजाराम वेताळ विरुध्द बाळासाहेब राजाराम वेताळ)
## (CNR No. MHSN170000092026)

दावा मिळकतीचे दिनांक १३/०१/२०२६ च्या परिस्थितीत बदल करुन न्यायालयाच्या आदेशाचा रिस्पॉडंट यांनी भंग केल्यामुळे त्यांनी घेतलेला बचाव रद्द (defence strike off) करण्यात यावा याकरिता अपिलार्थी यांनी सदरचा अर्ज दिलेला आहे.

२. अपिलार्थी यांचे म्हणणे की, रे. दि. मु. नं.१८५/२०२५ च्या दाव्यात रिस्पॉडंट यांच्याविरुध्द मनाई आदेश मिळण्याकरिता अर्ज दिला होता. तो अर्ज न्यायालयाने नामंजूर केला. त्या आदेशावर नाराज होवून अपिलार्थी यांनी सदरचे अपील दाखल केले आहे. दिनांक १३/०१/२०२६ ची वाद मिळकतीची परिस्थिती दाखविण्याकरिता अपिलार्थी यांनी छायाचित्रे दाखल केली आहेत. त्याचप्रमाणे दावा मिळकतीच्या परिस्थितीत बदल करणार नाही अशी लेखीहमी रिस्पॉडंट यांनी दिली. त्यानुसार न्यायालयाने अर्जावर आदेश पारीत केला. दिनांक १७/०१/२०२६ रोजी रिस्पॉडट यांनी वाद मिळकतीत नव्याने मुरुम आणून पसरवनू घेतले व दिनांक १३/०१/२०२६ रोजी असलेली वाद मिळकतीच्या परिस्थितीत बदल करुन लेखी हमीचा भंग केला. रिस्पॉडंट यांनी न्यायालयात दिलेल्या हमीपत्राच्या विपरित जाणीवपूर्वक, हेतुपुरस्सररित्या न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केल्यामुळे त्यांचेविरुध्द वर नमूद आदेश पारीत करण्याकरिता सदरचा अर्ज दिला आहे.

३. रिस्पॉडंट यांच्यातर्फे निशाणी २२ अन्वये सदरच्या अर्जाला म्हणणे दिले असून अर्जातील मजकूर नाकबूल केला आहे. दावा मिळकत रिस्पॉडंट क्र. ६अ ते ६इ यांची स्वतंत्र वाटप हिस्स्याची मिळकत असून गेल्या अनेक वर्षापासून रिस्पॉडंट तेथे रहात आहेत. अपिलार्थी व रिस्पॉडंट हे त्यांच्या स्वतंत्र घरांमध्ये रहात आहेत.

रिस्पॉडंट क्र. ६अ ते ६इ यांनी त्यांच्या घराचे बांधकाम सुरु केले होते, परंतु न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे बांधकाम बंद केले. दिनांक १३/०१/२०२६ रोजी रिस्पॉडंट यांनी न्यायालयात नवीन बांधकाम करणार नाही अशी तोंडी हमी दिली व त्याप्रमाणे आजही वाद मिळकतीची परिस्थिती आहे. रिस्पॉडंट यांनी न्यायालयाचा अवमान करुन कोणतेही नवीन बांधकाम केलेले नसल्यामुळे अर्ज रद्द करण्यात यावा.

४. अपिलार्थीतर्फे श्री. शेटे वकीलांनी युक्तीवाद केला की, दिनांक १३/०१/२०२६ ची वाद मिळकतीची परिस्थिती दाखविणारे छायाचित्रे अपिलार्थी यांनी दाखल केली आहेत. रिस्पॉडंट यांनी दावा मिळकतीत मुरुम पसरुन लेवल करुन त्यांनी दिलेल्या हमीची व न्यायालयाच्या आदेशाचा अवमान केला असल्यामुळे रिस्पॉडंट यांचा बचाव रद्द करण्यात यावा.

५. रिस्पॉडंटतर्फे श्री. के. एस. पाटील वकीलांनी युक्तीवाद केला की, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम २अ अन्वये स्वतंत्र अर्ज दाखल करणे आवश्यक असल्यामुळे सदरचा अर्ज टिकण्यायोग्य नाही. रिस्पॉडंट यांनी वाद मिळकतीत कोणत्याही प्रकारचे बांधकाम केलेले नाही. वाद मिळकतीत मुरुम टाकला म्हणजे बांधकाम केले असे म्हणता येणार नाही. रिस्पॉडंट यांनी नवीन बांधकाम करणार नाही अशी हमी न्यायालयात दिली होती व त्याप्रमाणे त्यांनी कोणत्याही प्रकारचे नवीन बांधकाम केलेले नसल्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

६. सदरच्या प्रकरणात अपिलार्थी यांनी दिलेल्या निशाणी ५ च्या अर्जावर दिनांक ०७/०१/२०२६ रोजी रिस्पॉडंट्स यांना नोटीस काढण्याचा आदेश करण्यात आला. दिनांक ०७/०१/२०२६ रोजी वाद मिळकतीची वस्तुस्थिती दाखवणारे कागदपत्र अर्जासोबत दाखल केले नसल्यामुळे व रिस्पॉडंट क्र. ६/१ ते ६/३ यांनी कॅव्हेट दाखल केल्यामुळे नोटीसचा आदेश करण्यात आला. दिनांक १३/०१/२०२६ रोजी अपिलार्थीतर्फे स्टेटस्को आदेश पारीत करण्याकरिता निशाणी १३ अन्वये अर्ज व

त्यासोबत फोटो दाखल करण्यात आले. त्यादिवशी रिस्पॉडंटतर्फे श्री. पी. एस. पाटील वकील हजर झाले व त्यांनी कोणत्याही प्रकारे बांधकाम करणार नाही अशी न्यायालयात तोंडी हमी दिल्यामुळे त्याचा उल्लेख करुन निशाणी १३ च्या अर्जावर स्टेटस्कोचा आदेश पारीत करण्यात आला.

७. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम २अ नुसार अपिलार्थी यांनी स्वतंत्र अर्ज दाखल करणे अपेक्षित आहे व तसे अपिलार्थी यांच्या वकीलांनी मान्य करुन अर्जातील दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम २अ ची विनंती मागे घेत असल्याचे तोंडी सांगितले. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम ११ च्या तरतुदीप्रमाणे अर्जातील कथन व रिस्पॉडंट यांचे म्हणणे विचारात घेण्यात आले आहे.

८. अभिलेखात दाखल असलेले कागदपत्र याचे अवलोकन केले असता वाद मिळकतीत वीट सिमेंटचे बांधकाम किंवा भिंतीचे बांधकाम किंवा पिलर उभे केल्याचे दिसून येत नाही. वाद मिळकतीत मुरुम पसरवलेला दिसत आहे. मुरुम पसरवणे म्हणजे बांधकाम होत नाही हा रिस्पॉडंटतर्फे वकीलांनी केलेला युक्तीवाद मान्य करण्यायोग्य आहे. वाद मिळकतीत रिस्पॉडंट यांनी पक्के बांधकाम केल्याचे दाखवणारे छायाचित्र अपिलार्थी यांनी दाखल केलेले नाहीत. अशा परिस्थितीत अर्जातील अपिलार्थी याची विनंती मान्य करण्यायोग्य नाही. सबब, रिस्पॉडंटतर्फे वकीलांनी केलेला युक्तीवाद ग्राह्य मानून मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येत आहे.

USHA VEERENDRA INDAPURE

Digitally signed by USHA VEERENDRA INDAPURE
Date: 2026.04.09 15:54:44 +0530

**विटा.** **(उषा वि. इंदापूरे)**

**दिनांक : ०९/०४/२०२६** **तदर्थ जिल्हा न्यायाधीश क्र.१, विटा.**